दैनिक
# हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ सोमवार, दि. २१ सप्टेंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १५१ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028


## 1 ऑक्टोबरपासून LPG सिलिंडर बुकिंगचे नियम बदलणार

**मुंबई :** घरगुती LPG सिलिंडर वापरणाऱ्या ग्राहकांसाठी महत्त्वाची बातमी आहे. १ ऑक्टोबर २०२६पासून अनुदानित दरात घरगुती LPG सिलिंडर बुक करण्यासाठी बायोमेट्रिक आधार ऑथेंटिकेशन (BAA) पूर्ण करणे आवश्यक असणार आहे. केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने यासंदर्भात नवा नियम जाहीर केला आहे. मंत्रालयाच्या माहितीनुसार, सबसिडीसह नियंत्रित किरकोळ विक्री किमतीत (RSP) LPG सिलिंडर बुक करण्यासाठी ग्राहकाचे बायोमेट्रिक आधार ऑथेंटिकेशन पूर्ण असणे गरजेचे असेल.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत पोलिसाचा जागीच मृत्यू

**पुणे :** पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर भीषण अपघातात पोलीस कर्मचाऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. उरुळी कांचन पोलीस ठाण्यात सहाय्यक फौजदार म्हणून कार्यरत असलेले गणेश रतन दाभाडे (वय 49) यांचा अज्ञात वाहनाच्या धडकेत मृत्यू झाला. शुक्रवारी (18 सप्टेंबर) मध्यरात्री सव्वाबारा वाजण्याच्या सुमारास श्रीकृष्ण मंगल कार्यालयासमोर, ग्रीन पार्क हॉटेलजवळ ही घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, गणेश दाभाडे हे पोलीस ठाण्यातील काम आटोपून बाहेर पडले होते.

## थोडक्यात वार्ता

### ज्येष्ठ पत्रकार पायल मेहता यांचे वयाच्या 46 व्या वर्षी निधन

**नवी दिल्ली :** ज्येष्ठ पत्रकार पायल मेहता यांचे वयाच्या 46 व्या वर्षी अचानक निधन झाले. प्रकृती अचानक बिघडल्याने त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाची बातमी समोर आल्यानंतर पत्रकारिता क्षेत्रात हळहळ व्यक्त केली जात आहे. पायल मेहता यांनी राजकीय आणि राष्ट्रीय विषयांवर दीर्घकाळ पत्रकार म्हणून काम केले होते. पायल मेहता यांच्या निधनानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान आणि भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी शोक व्यक्त केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर पोस्ट करत पायल मेहता यांच्या पत्रकारितेतील कामाची आठवण काढली. मोदी यांनी पायल मेहता या मेहनती आणि जमिनीशी जोडलेल्या पत्रकार असल्याचे म्हटले. राष्ट्रीय विषयांची त्यांना चांगली जाण होती आणि त्याचा प्रभाव त्यांच्या वार्तांकनातून दिसून येत होता, असेही त्यांनी नमूद केले. त्यांच्या कामासोबतच इतरांशी आपुलकीने वागण्याच्या स्वभावाचीही मोदी यांनी आठवण केली. राजनाथ सिंह यांनीही पायल मेहता यांच्या निधनावर दुःख व्यक्त केले. संसद अधिवेशनाच्या काळात त्या पहाटेपासून रात्री उशिरापर्यंत संसदेत उपस्थित राहून कामकाजाचे वार्तांकन करत असत. पत्रकारितेप्रती त्यांची असलेली निष्ठा आणि कामातील सातत्य याचा उल्लेख राजनाथ सिंह यांनी केला. केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी पायल मेहता यांना संवेदनशील आणि मेहनती पत्रकार म्हणून आठवले. त्यांच्या निधनामुळे पत्रकारिता क्षेत्राचे मोठे नुकसान झाल्याचे त्यांनी म्हटले.

### मध्य रेल्वेची कारवाई! विनातिकीट प्रवाशांकडून 140 कोटींचा दंड वसूल

**मुंबई :** रेल्वे प्रवाशांना सुरक्षित, सुलभ आणि सन्मानजनक प्रवासाची खात्री करून देण्यासाठी मध्य रेल्वेने विनातिकीट आणि अनधिकृत प्रवासाविरुद्धची मोहीम अधिक तीव्र केली आहे. किमान दंडाच्या रकमेत झालेली वाढ आणि सखोल तपासणी मोहिमांमुळे चालू आर्थिक वर्षात मध्य रेल्वेने दंडात्मक वसुलीत विक्रमी कामगिरी नोंदवली आहे. एप्रिल ते ऑगस्ट २०२६ या कालावधीत मध्य रेल्वेने तब्बल १८.०३ लाख विनातिकीट प्रवाशांवर कारवाई करत १४०.८१ कोटी रुपयांचा दंड वसूल केला आहे.मध्य रेल्वेच्या समर्पित तिकीट तपासणी पथकांनी ही कारवाई केली आहे. गेल्या वर्षी (एप्रिल ते ऑगस्ट २०२५) याच कालावधीत १७.१९ लाख प्रकरणांतून १००.५० कोटी रुपयांचा दंड वसूल करण्यात आला होता. यावर्षी प्रकरणांच्या संख्येत सुमारे ५% वाढ झाली असून, दंड वसुलीच्या उत्पन्नात तब्बल ४०% पेक्षा जास्त मोठी वाढ नोंदवली गेली आहे. या आकडेवारीनुसार, मध्य रेल्वेतर्फे दररोज सरासरी ११,००० पेक्षा अधिक जणांवर दंडात्मक कारवाई करून सुमारे ९२.०३ लाख रुपयांची वसुली केली जात आहे.

### मोतीलाल नगरचा कायापालट करण्यासाठी 'मास्टर प्लॅन'

**मुंबई:** गोरेगाव पश्चिमेतील मोतीलाल नगर १, २ आणि ३ या वसाहतींच्या पुनर्विकास प्रकल्पाचे काम महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाने (म्हाडा) हाती घेतले आहे. म्हाडाकडून हाती घेण्यात आलेल्या पुनर्विकास प्रकल्पामध्ये तब्बल १५ एकर हरित परिसराची निर्मिती केली जाणार आहे. म्हाडाकडून गेल्या काही वर्षांपासून मुंबई आणि उपनगरामध्ये क्लस्टर पुनर्विकासावर भर दिला जात आहे. त्याच आधारावर मोतीलाल नगरमध्येही क्लस्टर पुनर्विकासाच्या माध्यमातून विकास केला जाणार आहे. तिथल्या नागरिकांना प्रशस्त घर आणि परिसरातील सुशोभिकरण यामुळे त्यांचे राहणीमान आणखीन सुधारणार आहे. मोतीलाल नगरमध्ये उभारल्या जाणाऱ्या हरित परिसराचा मॉडेल शक्य असेल त्या ठिकाणीही म्हाडाकडून उभारला जाणार आहे. मुंबईपासून काही मिनिटांच्या अंतरावर असणाऱ्या गोरेगावमध्ये मोठ्याप्रमाणावर नागरिकांची वस्ती आहे.

## अजिंठा लेणीत 'फायबर ऑप्टिक'च्या नावाखाली अधिकाऱ्यांची चिरीमिरी
# 15 नोव्हेंबर 2025 च्या मुदतीआधीच कामात काळोख RTI च्या दणक्याने ASI चे धाबे दणाणले

फर्दापूर प्रतिनिधी शेख हक्कानी

फर्दापूर जागतिक वारसा असलेल्या अजिंठा लेणीला जगभरातून पर्यटक भेट देतात पण याच लेणीच्या अंधारात 'फायबर ऑप्टिक लाईटिंग'च्या नावाखाली नेमका कोणता काळोख शिजतोय घारदोनचे सजग नागरिक सचिन दिगंबर खरात यांनी टाकलेल्या माहिती अधिकाराच्या RTI बॉम्ब'मुळे भारतीय पुरातत्व सर्वेक्षणाच्या ASI भोंगळ कारभाराचे आणि टक्केवारीच्या साखळीचे बिंग फुटण्याची शक्यता निर्माण झाली आहे २०२५ ची मुदत असतानाही अद्याप अनेक ठिकाणी कामाचा पत्ता नाही या देखभालीच्या नावाखाली अधिकाऱ्यांनी कंत्राटदारांसोबत संगनमत करून केवळ 'चिरीमिरी' तर खाल्ली नाही ना असा संतप्त आणि झणझणीत सवाल आता विचारला जात आहे!

कागदावरचे 'कुशल' मजूर की नुसतीच बोगस बिले

लेणी क्रमांक १ २ १६ १७ आणि १९ मधील अत्यंत संवेदनशील चित्रांसाठी आणि इल्युमिनेटर्सच्या देखभालीसाठी ITI इलेक्ट्रिशियन कुशल आणि अकुशल मजुरांची फौज तैनात केल्याचा दावा ASI ने केला आहे या वार्षिक देखभालीची AMC अंतिम मुदत १५ नोव्हेंबर २०२५ आहे पण हा मजूर वर्ग खरोखरच तिथे काम करतोय की फक्त कंत्राटदाराच्या बिलांच्या फाईलमध्ये त्यांचे अस्तित्व आहे या मजुरांच्या खोट्या सह्या घेऊन शासनाचे लाखो रुपये लाटले जात असल्याची दाट शंका आहे या कथित कुशल मजुरांना लेणीतील ऐतिहासिक चित्रांचे गांभीर्य तरी समजते का



महागड्या केबल्स आणि दिव्यांच्या नावाखाली उखळ पांढरे

देखभालीच्या नावाखाली फ्युज झालेले दिवे एक्झॉस्ट फॅन्स आणि FSPT 25 50 62 आकाराच्या महागड्या नवीन फायबर केबल्स बसवण्याची लखलखीत तरतूद यात दाखवण्यात आली आहे शिवाय ६ KVA UPS च्या देखभालीसाठी थेट Vertiv Energy Pvt Ltd या बड्या कंपनीच्या घशात कंत्राट घातले आहे पण २०२५ ची मुदत जवळ येत असतानाही प्रत्यक्षात किती केबल्स बदलल्या की जुन्याच केबल्स आणि दिव्यांवर रुमालाने धूळ झटकून नवीन माल टाकल्याची खोटी बिले पास केली जात आहेत साहित्याच्या खरेदीत किती 'गोलमाल' झालाय याचा हिशोब कोण देणार कागदपत्रे लपवण्याची ASI ची चलाखी दालनात कसली 'सेटिंग' सुरू आहे

RTI मध्ये भ्रष्टाचाराचा सगळा कच्चाचिठ्ठा उघड होईल या भीतीने ASI च्या अधिकाऱ्यांची पाचावर धारण बसली आहे कागदपत्रे संकलित नाहीत कार्यालयात येऊन पहा आणि पैसे भरून झेरॉक्स घ्या अशी अत्यंत उडवाउडवीची आणि संशयास्पद उत्तरे जन माहिती अधिकारी डॉ शिल्पा जामगडे यांच्या स्वाक्षरीने देण्यात आली आहेत जर तुमचा कारभार खरोखरच पारदर्शक आहे, तर कागदपत्रे थेट हातात द्यायला अधिकाऱ्यांचे हात का थरथरत आहेत कार्यालयाच्या फेऱ्या मारायला लावून अर्जदाराला थकवण्याचा आणि 'सेटिंग' करण्यासाठी वेळ मारून नेण्याचा हा डाव तर नाही ना

आता खरी परीक्षा प्रत्यक्ष पाहणीत पांढरपेशे उघडे पडणार

अजिंठा लेणीतील चित्रे अत्यंत नाजूक आहेत चुकीच्या लाईटिंगमुळे किंवा निकृष्ट दर्जाच्या केबलमुळे या जागतिक वारशाला साधा ओरखडा लागला तर ती आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाची बदनामी ठरेल ASI ने कार्यालयात बोलावून प्रत्यक्ष कागदपत्रे पाहण्याची मुभा दिली असली तरी आता या लाईटिंग'च्या झगमगाटामागे दडलेला खरा अंधार आणि साहित्याचा निकृष्ट दर्जा उजेडात येणार आहे

RTI मधून मिळालेल्या या पुराव्यांनंतर आता प्रत्यक्ष कामाची क्वालिटी टेस्ट आणि ऑडीट झाल्यास अजिंठा लेणीच्या अंधारात 'चिरीमिरी' खाणारे अनेक पांढरपेशे अधिकारी आणि कंत्राटदार उघडे पडतील यात शंका नाही प्रशासनाला आता केवळ उत्तर नको तर या सर्व प्रकरणाची थर्ड पार्टी इन्व्हेस्टिगेशन हवी अशी आक्रमक मागणी जोर धरू लागली आहे

## बातमीचा सर्जिकल स्ट्राईक 5 तारखेच्या दणक्याने झोपेचे सोंग घेतलेले ठेकेदार खडबडून जागे तोंडापूर फाट्यावर अखेर मशिनरी धडकली





फर्दापूर–तोंडापूर सिमेंट रस्त्याचे काम आठ महिन्यांपासून ठप्प!

शेतकऱ्यांचा गंभीर आरोप; अडथळे निर्माण करणाऱ्यावर कारवाईची मागणी, अन्यथा आंदोलनाचा इशारा

फर्दापूर प्रतिनिधी शेख हक्कानी

अधिकाऱ्यांची मुजोरी आणि कंत्राटदाराची मनमानी कधीकधी एका झणझणीत बातमीने कशी वठणीवर येते याचा जिवंत थरार आज तोंडापूर फाट्यावर पाहायला मिळाला ५ सप्टेंबर रोजी आम्ही तोंडापूर फाट्याच्या रखडलेल्या कामाचे वाभाडे काढणारी बातमी लावली आणि बघता बघता प्रशासनाच्या पायाखालची वाळूच सरकली या बातमीचा एवढा महादणका बसला की शेपूट घालून बसलेला कंत्राटदार आज २० सप्टेंबर रोजी थेट ग्रेडर मशीन घेऊन रस्त्यावर हजर झाला आहे

अधिकाऱ्यांची कुंभकर्णी झोप आणि लेखणीचा दणका

अर्ध्यावर काम सोडून पसार झालेल्या ठेकेदाराला आणि तेरी भी चूप मेरी भी चूप करत डोळ्यावर पट्टी बांधून बसलेल्या अधिकाऱ्यांना ५ तारखेच्या आमच्या बातमीने चांगलाच घाम फोडला जनतेच्या जिवाशी आणि पैशाशी खेळणाऱ्या या टोलवाटोलवीला थेट वेशीवर टांगल्याने स्वत ची उरलीसुरली अब्रू वाचवण्यासाठी का होईना पण आज अखेर प्रशासनाला हे काम सुरू करावेच लागले जागरूक पत्रकारितेचा इंगा काय असतो हे आज प्रशासनाने चांगलेच अनुभवले

'ग्राउंड झिरो'वर मशिनरीची धडक ठेकेदाराची पळापळ

आज २० सप्टेंबर रोजी आमच्या प्रतिनिधीने थेट ग्राउंड झिरो गाठून या कामाची झाडाझडती घेतली बातमीचा एवढा धसका घेण्यात आलाय की रस्त्यावर तात्काळ ग्रेडर Grader मशीन लावून सपाटीकरण आणि खडीकरणाचा धुरळा उडवला जात आहे कालपर्यंत गायब असलेले कंत्राटदाराचे चेलेचपाटे आज स्वत भर उन्हात रस्त्यावर उभे राहून काम मार्गी लावताना दिसले हा केवळ आणि केवळ बातमीचा 'इम्पॅक्ट' आहे

रोज धुळीचा आणि खड्ड्यांचा नरकवास भोगणाऱ्या नागरिकांनी आज सुटकेचा निश्वास टाकत आमच्या बातमीचे तोंडभरून कौतुक केले आहे पण आमची कंत्राटदार आणि संबंधित अधिकाऱ्यांना ही खुली आणि 'कडक वॉर्निंग' आहे काम सुरू केले म्हणजे तुम्ही जनतेवर कोणतीही मेहरबानी केलेली नाही

जर हे काम पुन्हा मध्येच थांबले बिलांसाठी नुसतीच रंगरंगोटी केली किंवा या रस्त्याच्या क्वालिटी मध्ये थोडी जरी हयगय झाली तर पुढच्या वेळी याहून मोठा बॉम्ब फोडला जाईल आणि थेट अधिकाऱ्यांच्या दालनात घुसू हे काम दर्जेदार आणि वेळेत पूर्ण होते की नाही यावर आता आमची करडी नजर असणार आहे

## दोन लाख घेऊन बँकेबाहेर पडताच चोरट्यांनी पळविली हातातील पैशांची बॅग

**गंगापूर दि.२० :** सोने तारण ठेवून मिळालेले दोन लाख रुपये घेऊन बँकेबाहेर पडलेल्या ६० वर्षीय शेतकऱ्याच्या हातातील पैशांची बॅग दोन अनोळखी दुचाकीस्वारांनी हिसकावून नेल्याची घटना शनिवारी (दि. १९) दुपारी साडेबारा वाजेच्या सुमारास लासूरनाका चौकातील बुलढाणा अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीसमोर घडली. या घटनेत १ लाख ५० हजार रुपयांची रोकड लंपास झाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विनायक पुंजाराम गोरे (वय ६०, रा. सोलेगाव, ता. गंगापूर) हे शनिवारी सकाळी १०.४५ वाजता बुलढाणा अर्बन पतसंस्थेत सोने गहाण ठेवून दोन लाख रुपये घेऊन बाहेर आले. त्यांच्याकडून भाचे प्रमोद पवार यांना ५० हजार रुपये देणे असल्याने त्यांनी दुपारी १२.२२ वाजता फोन करून बँकेसमोर बोलावून घेतले. गोरे यांनी पिशवीतील ५० हजार रुपये भाच्याला दिले.

त्यानंतर उर्वरित दीड लाख रुपये असलेली बॅग हातात घेऊन गोरे मोटारसायकलकडे जात असताना दुपारी १२.२५ ते १२.३० वाजेच्या दरम्यान दोन अनोळखी व्यक्ती दुचाकीवरून त्यांच्या जवळ आले. त्यांनी गोरे यांच्या हातातील पैशांची बॅग जोराचा हिसका देऊन हिसकावून घेतली आणि भेंडाळा फाट्याच्या दिशेने दुचाकीवरून पसार झाले.

गोरे यांनी दिलेल्या वर्णनानुसार दुचाकी चालकाचे वय अंदाजे २५ ते ३० वर्षे असून तो सडपातळ बांध्याचा, काळा शर्ट, फुल पॅन्ट व हेल्मेट परिधान केलेला होता. मागे बसलेल्या व्यक्तीचेही वय अंदाजे २५ ते ३० वर्षे असून त्याने काळा शर्ट, फुल पॅन्ट व लाल टोपी घातली होती.

चोरीस गेलेल्या रकमेत ५०० रुपयांच्या २०० नोटा आणि १०० रुपयांच्या ५०० नोटांचा समावेश असल्याचे फिर्यादीत नमूद आहे. याप्रकरणी विनायक गोरे यांनी गंगापूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून, पुढील तपास पोलीस निरीक्षक सलीम चाऊस यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मधुकर मोरे करीत आहेत.

## ग्रामसेवकाचा विधवेवर बलात्कार, गुन्हा दाखल

**हिंगोली :** विधवा महिलेला तिच्या पतीचे कारचे कर्ज न्यायालयातून सेटलमेंट करून कार परत मिळवून देतो असे म्हणून विश्वासात घेत विधवा महिलेला हिंगोली येथील ग्रामसेवकाने त्याच्या राहत्या घरी गुंगीचे औषध देऊन बलात्कार केल्याप्रकरणी जालना जिल्ह्यातील करमाड पोलिस ठाण्यात महिलेने ऑनलाईन सीसीटीएनएस प्रणालीअंतर्गत हिंगोली ग्रामीण पोलिसात गुन्हा दाखल केला आहे.

ग्रामीण पोलिसांचे पथक ग्रामसेवकाला ताब्यात घेण्यासाठी रवाना झाले आहे. याबाबत अधिक माहीती अशी की, ग्रामसेवक गणेश पंजाबराव माने रा. अकोला बायपास, बळसोंड रोड, हिंगोली याने विधवा महिलेला तिचे मयत पतीचे कार लोन न्यायालयातून सेटलमेंट करून देऊन कार परत मिळवून देतो असे म्हणून विश्वासात घेवून तिला दि ६ ऑगस्ट २०२६ ते १४ सप्टेंबर २०२६ ग्रामसेवक माने याने त्याच्या राहत्या घरी कशाचे तरी गुंगीचे औषध देऊन बळजबरीने शारीरिक संबंध ठेवले. कोणाला सांगितले तर जीवे मारून टाकीन अशी धमकी दिली. भितीच्या पोटी विधवा महिलेने ग्रामसेवक माने याच्या तावडीतून सुटून जालना जिल्ह्यात करमाड येथील पोलिस ठाण्यात ग्रामसेवक गणेश माने याच्याविरोधात गुन्हा दाखल केला असून झिरो अंतर्गत सदरील गुन्हा हिंगोली ग्रामीण पोलिसांकडे वर्ग करण्यात आला आहे. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेवून पोलिसांनी तत्काळ ग्रामसेवक माने याच्या मुसक्या आवळण्यासाठी पथक रवाना केले आहे. या घटनेमुळे मोठी खळबळ उडाली असून ग्रामसेवकाची एवढी दहशत कशी निर्माण होते, असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे.

## युवकाने केली शाळेच्या आवारात गळफास घेऊन आत्महत्या
### नानल पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल; आत्महत्येचे कारणअस्पष्ट

हिंदू प्रकाश वार्ता / अशोक पवार

**परभणी:-** शहरातील गजबजलेला परिसर म्हणजे खंडोबा बाजार या परिसरातील एका नामांकित शाळेच्या परिसरात असलेल्या लिंबाच्या झाडाला एका युवकांनी दिनांक 20 सप्टेंबर रविवार रोजी सकाळी साडेआठच्या दरम्यान गळफास घेऊन आत्महत्या केली सदरील मयत तरुणाचे नाव संजय दरबस्तेंवार वय पंचवीस वर्षे आहे याप्रकरणी नानल पेठ पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.



लोहार गल्ली गांधीनगर परिसरातील मयत युवक संजय दरबस्तेवार हा आपल्या आई वडील आणि भावासोबत राहत होता आपल्या ऑटो व्यवसायातून कुटुंबास हातभार लावत होता मात्र अचानक दिनांक 20 सप्टेंबर रविवार रोजी सकाळी साडे आठ वाजताच्या दरम्यान परिसरातील शाळेच्या आवारात असलेल्या लिंबाच्या झाडाला संजय दरबस्तेवार या युवकाचे प्रेत लटकलेल्या अवस्थेत आढळून आले या घटनेची माहिती अर्जुन दरभस्तेवार यांनी नानलपेठ पोलिसांना दिली घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक गोबाडे यांच्या आदेशावरून सहायक पोलीस उपनिरीक्षक सय्यद मुक्तार पोलीस हवालदार काकडे पोलीस नामदार रासवे पोलीस हवालदार लिंगायत पोलीस हवालदार चव्हाण यांनी भेट देऊन पंचनामा केला या प्रकरणाची नोंद अकस्मात मूर्तीचे नोंद नाना पेठ पोलीस ठाण्याच्या करण्यात आली असून सदर आत्महत्येचे कारण स्पष्ट झाले नसून अधिक तपास पोलीस नामदार रासवे हे करीत आहेत.


## "शाल जोडे"




# कर्मचारी संघटनांनी हक्कांसोबत कर्तव्यालाही प्राधान्य द्यावे
### विधायक कामातून आदर्श निर्माण करणाऱ्या वीज कामगार महासंघाचे किशोर शितोळे यांच्याकडून कौतुक

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** कर्मचारी संघटना केवळ आपल्या हक्कांसाठी आवाज उठविणारी नसून, जनतेप्रती असलेली कर्तव्येही तितक्याच जबाबदारीने पार पाडणारी असावी. वीज कर्मचारी जनतेला उत्तम सेवा देत असून, त्यानंतर विधायक मार्गाने आपल्या हक्कांची मागणी करतात. ही कार्यपद्धती इतर कर्मचारी संघटनांसाठी आदर्श ठरावी, असे मत भाजप जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांनी व्यक्त केले.




महाराष्ट्र वीज कामगार महासंघ सहकारी पतसंस्था मर्यादित, छत्रपती संभाजीनगरच्या वतीने आयोजित ४१व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत, गुणवंत पाल्यांचा बक्षीस वितरण समारंभ, सेवानिवृत्त सभासदांचा सत्कार आणि कौटुंबिक कामगार मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी शितोळे यांनी महासंघाच्या विधायक कार्यपद्धतीचे कौतुक केले.

शितोळे म्हणाले, "संघटना फक्त हक्क मागत नाही, तर आधी कर्तव्य पूर्ण करते. जनतेला उत्तम सेवा देते आणि त्यानंतर विधायक मार्गाने आपल्या हक्कांची मागणी करते, ही या महासंघाची विशेष बाब आहे." महासंघाचे काम करण्याचे स्वरूप अतिशय विधायक असून, इतर कर्मचारी संघटनांनीही त्यातून प्रेरणा घ्यावी, असे त्यांनी सांगितले.

मुलांना 'क्वालिटी टाइम' द्या

नोकरीच्या धावपळीत कर्मचाऱ्यांचा बहुतांश वेळ कामात जातो. घरी आल्यानंतरही टीव्ही आणि मोबाईलमध्ये वेळ खर्च होतो. त्यामुळे कुटुंबाला, विशेषतः मुलांना दर्जेदार वेळ देणे गरजेचे आहे. मुलांशी संवाद साधणे, त्यांच्यासोबत खेळणे आणि त्यांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे आवश्यक आहे. पालकांनी मुलांना पुरेसा वेळ देऊन त्यांच्या अडचणी समजून घेतल्या, तर त्यांना चुकीच्या संगतीत आधार शोधण्याची गरज भासणार नाही. यातून संस्कारित आणि विधायक विचारांची पिढी घडण्यास मदत होईल, असे शितोळे यांनी नमूद केले.

पतसंस्थेची प्रगती अभिमानाची बाब

पतसंस्थेची आर्थिक प्रगती, उत्तम उलाढाल आणि नफा ही अभिमानाची बाब आहे. कर्मचाऱ्यांसाठी आर्थिक संस्था चालविणे ही सोपी जबाबदारी नसून एक प्रकारचा काटेरी मुकुट आहे. मात्र, पदाधिकारी आणि संचालक मंडळाने ही जबाबदारी उत्तम प्रकारे पार पाडली आहे, असे सांगत त्यांनी पतसंस्थेच्या कार्याचे कौतुक केले. प्रमुख मार्गदर्शक अरुण पिवळे यांच्या कार्याचेही त्यांनी कौतुक केले. संस्थेच्या वाटचालीत योगदान देणाऱ्या सर्व पदाधिकारी, संचालक मंडळ आणि कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करून संस्थेची विधायक आणि विश्वासार्ह वाटचाल पुढेही सुरू राहावी, अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या. यावेळी किशोर शितोळे यांच्या हस्ते सेवानिवृत्त कर्मचारी तसेच गुणवंत पाल्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अण्णा ताटे होते. यावेळी अंजना ठाकरे, अधीक्षक अभियंता (पारेषण) यांच्यासह महासंघाचे पदाधिकारी, संचालक मंडळ, कर्मचारी, सभासद आणि त्यांच्या कुटुंबीयांची उपस्थिती होती.

# पीएच.डी. फेलोशिपसाठी संशोधक विद्यार्थ्यांचे समाज कल्याण समोर बेमुदत धरणे

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : सारथी, बार्टी, महाज्योती, टीआरटीआय, आर्टी, वनार्टी आणि अमृत या संस्थांच्या माध्यमातून पीएच.डी. नोंदणी झालेल्या सर्व पात्र संशोधक विद्यार्थ्यांना सरसकट अधिछात्रवृत्ती द्यावी, या प्रमुख मागणीसाठी समाजकल्याण कार्यालयासमोर सुरू असलेल्या बेमुदत धरणे आंदोलनाचा नववा दिवस पूर्ण झाला. मात्र, अद्याप शासनाकडून ठोस निर्णय झालेला नसल्याने संशोधक विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संशोधक विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाला भेटीसाठी तातडीने वेळ द्यावा, अशी मागणीही आंदोलनकर्त्यांनी केली.

पीएच.डी. नोंदणी झाल्यानंतर संशोधनासाठी संदर्भग्रंथ, अभ्याससामग्री, प्रवास, डेटा संकलन आणि इतर शैक्षणिक बाबींवर मोठा खर्च करावा लागतो. आर्थिक सहाय्याअभावी अनेक संशोधक विद्यार्थ्यांना संशोधन पूर्ण करताना अडचणी येत आहेत. त्यामुळे पीएच.डी. नोंदणी झालेल्या सर्व पात्र विद्यार्थ्यांना कोणत्याही भेदभावाशिवाय अधिछात्रवृत्ती देण्यात यावी, अशी विद्यार्थ्यांची मागणी आहे.



संशोधक विद्यार्थ्यांच्या म्हणण्यानुसार, यापूर्वी विविध संस्थांच्या माध्यमातून मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांना फेलोशिपचा लाभ मिळाला आहे. मात्र, आता फेलोशिपची संख्या मर्यादित करण्याऐवजी संशोधकांची वाढती संख्या लक्षात घेऊन निधीत वाढ करणे आवश्यक आहे. एका संस्थेमार्फत केवळ १०० विद्यार्थ्यांना फेलोशिप देण्याची मर्यादा अन्यायकारक असल्याचे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे.

फेलोशिपमध्ये घरभाडे भत्ता (एचआरए) आणि आनुषंगिक निधी पूर्ववत सुरू करावा, संशोधन अधिछात्रवृत्तीसाठी असलेली ३५ वर्षांची वयोमर्यादा शिथिल करावी तसेच २०२६ मध्ये पीएच.डी. नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांनाही तातडीने फेलोशिप प्रक्रियेत सहभागी करून घ्यावे, या मागण्याही विद्यार्थ्यांनी केल्या आहेत.

फेलोशिपच्या मागणीसाठी यापूर्वी सारथी, बार्टी, महाज्योती कार्यालयांसमोर तसेच पुण्यातील गोखले चौकात संशोधक विद्यार्थ्यांनी आंदोलन केले आहे. आता समाजकल्याण कार्यालयासमोर सुरू असलेल्या बेमुदत धरण्याला नववा दिवस पूर्ण झाला आहे. शासनाने मागण्यांवर तातडीने निर्णय न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा विद्यार्थ्यांनी दिला आहे.

आंदोलनात अरुण मते, हरीकेश मोरे, मनिषा बल्लाळ, भारत पवार, कृष्णा घाडगे, गीता मगर, मोहन मुंडे, सचिन अनुष्ठान, उन्नती काला, अभिषेक गायकवाड, मंगेश घाटूळ, श्वेता वराडे, आरती दांगोडे, मिरा सावंत, प्रदीप चव्हाण, रवी राठोड, श्रीकांत पातोळे यांच्यासह मोठ्या संख्येने संशोधक विद्यार्थी सहभागी झाले होते.

**प्रमुख मागण्या** : पीएच.डी. नोंदणी झालेल्या सर्व पात्र विद्यार्थ्यांना सरसकट फेलोशिप द्यावी. फेलोशिपमधील एचआरए व आनुषंगिक निधी पूर्ववत सुरू करावा. ३५ वर्षांची वयोमर्यादा शिथिल करावी. २०२६ मध्ये पीएच.डी. नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांना फेलोशिप प्रक्रियेत सहभागी करून घ्यावे.

## हँडबॉलमध्ये छत्रपती संभाजीनगरच्या दोन खेळाडूंची क्रीडा प्रबोधिनीत निवड

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी







**छत्रपती संभाजीनगर** : हँडबॉलमधील कौशल्य चाचणीत उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल छत्रपती संभाजीनगरचा सविधान निकाळजे आणि वैजापूरचा वेदांत घुले या दोन युवा खेळाडूंची नागपूर येथील क्रीडा प्रबोधिनीत निवड झाली आहे. कौशल्य चाचणीतील कामगिरीच्या आधारे ही निवड करण्यात आली.

सातत्यपूर्ण सराव, मेहनत आणि उत्कृष्ट क्रीडा कौशल्याच्या जोरावर दोन्ही खेळाडूंनी ही कामगिरी केली. सविधान निकाळजे याला सुयश साळवे, तर वेदांत घुले याला अक्षय नवले यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली दोन्ही खेळाडूंनी नियमित सराव करून आपल्या खेळात प्रगती साधली.

या निवडीबद्दल महाराष्ट्र हँडबॉल असोसिएशनचे अध्यक्ष तथा कॅबिनेट मंत्री अतुल सावे, जिल्हा हँडबॉल असोसिएशनचे अध्यक्ष माजी आमदार श्रीकांत जोशी आणि सचिव सत्यजित पगारे यांनी दोन्ही खेळाडूंचे अभिनंदन केले.

नागपूर येथील क्रीडा प्रबोधिनीत झालेली निवड ही दोन्ही खेळाडूंच्या क्रीडा कारकिर्दीतील महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. आगामी काळात उत्कृष्ट कामगिरी करून जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करावे, अशा शुभेच्छा क्रीडा क्षेत्रातून व्यक्त करण्यात आल्या.

## गुरु रविदास महाराज यांच्या650 व्या जयंती निमित्त संवाद मेळावा

### आरोग्य शिबिर, रक्तदान शिबिर, अंगणवाडी सेविकांचा सन्मान व संरक्षण भिंतीचे लोकार्पण सोहळा संपन्न

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी



**परभणी** :-संत शिरोमणी गुरु रविदास महाराज यांच्या ६५० व्या जयंतीनिमित्त तसेच देशाचे लाडके पंतप्रधान मा. श्री. नरेंद्रजी मोदी आणि भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष मा. श्री. रवींद्रजी चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी परभणी महानगरच्या वतीने गुरु रविदास महाराज भवन तथा प्रबोधन केंद्र, एम.आय.डी.सी. परिसर, परभणी येथे चर्मकार समाज मेळावा, भव्य आरोग्य शिबिर, रक्तदान शिबिर, अंगणवाडी सेविकांचा सन्मान सोहळा तसेच संरक्षण भिंतीच्या लोकार्पण सोहळा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमास समाजबांधव, मान्यवर, लोकप्रतिनिधी, भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपा परभणी महानगर जिल्हाध्यक्ष मा. श्री. शिवाजीराव भरोसे हे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री. अमोलजी वाघमारे (गुरु रविदास वाणीचे अभ्यासक) यांनी उपस्थितांना गुरु रविदास महाराजांचे विचार, गुरुवाणीतील संदेश तसेच सामाजिक समता, बंधुता आणि मानवतेचे महत्त्व याबाबत सखोल मार्गदर्शन केले.

यावेळी श्री. भालचंद्र गोरे यांनी उपस्थितांना संबोधित करताना समाजातील युवकांनी शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देऊन समाजाची उन्नती साधावी, असे आवाहन केले. प्रमुख अतिथी म्हणून सौ. प्रभावतीताई अन्नपूरे, मोतीरामजी कांबळे, भगवानराव असेवार, डॉ. भगवान अस्वारकर, प्रा. रमा शेजावळे, सौ. मनीषा जाधव, श्री. उमेश शेळके, डॉ. मनोज पोरवाल, डॉ. मंजुषा नरवाडकर, सौ. अपर्णा जोशी, सौ. दिपाली वाघ, श्री अंकुश जोगदंड,जिल्हाध्यक्ष श्री. मुरलीधर ठोंबरे

संत रविदास प्रतिष्ठान व राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे

रामकिशन कांबळे, नरहरी सोनवणे, शेवाळे सर,

यांनी परिश्रम घेतले.

यावेळी समाजाच्या जडणघडणीत महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या अंगणवाडी सेविकांचा साडी वाटप करून सन्मान करण्यात आला. बालकांचे संगोपन, पोषण व महिला सक्षमीकरणासाठी केलेल्या त्यांच्या योगदानाबद्दल मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले.

## ग्राहकांसाठी यूपीआय पेमेंट मोफत

**छत्रपती संभाजीनगर** : यूपीआयच्या माध्यमातून होणाऱ्या डिजिटल पेमेंटबाबत ग्राहक आणि व्यापाऱ्यांमध्ये एमडीआरबाबत अनेक प्रश्न असतात. ग्राहकांसाठी यूपीआय पेमेंट मोफतच राहणार असून, निवडक पात्र व्यापारी व्यवहारांवर मर्चंट डिस्काउंट रेट (एमडीआर) लागू करण्यात आला आहे.एमडीआर म्हणजे ग्राहकांकडून कार्ड किंवा डिजिटल पेमेंट स्वीकारताना व्यापाऱ्याला द्यावी लागणारी फी. मात्र, यूपीआयद्वारे पेमेंट करणाऱ्या ग्राहकांकडून कोणतीही एमडीआर फी आकारली जाणार नाही.

## बिस्पोक एआय अप्लायन्सेसची श्रेणी लाँच

गुरुग्राम- सॅमसंग इंडियाने आज आपल्या २०२६ बिस्पोक एआय अप्लायन्सेस लाइनअप लाँच केली, जी ग्राहकांचे जीवन अधिक समृद्ध आणि सुलभ करण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे. 'द ब्रीफ गुरुग्राम' या अत्याधुनिक अनुभवात्मक इव्हेण्टमध्ये सॅमसंगने दाखवून दिले की, एआय विविध उत्पादन श्रेणींमधील एक समान धागा म्हणून कार्य करतो, ज्यामध्ये स्मार्टथिंग्स प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून सवयी शिकून घेणे, कामे स्वयंचलित करणे आणि ऊर्जेच्या वापरावर नियंत्रण ठेवण्यास सक्षम असलेल्या परिसंस्थेत हवामान नियंत्रण, लाँड्री, लिव्हिंग रुम आणि किचन यांना एकत्र जोडले जाते.

## रिअल इस्टेट क्षेत्र आणि सरकारमध्ये संवाद

**पुणे:** क्रेडाई महाराष्ट्राच्या वतीने **'क्रेडाई महाराष्ट्र मॅनेजिंग कमिटी आणि क्रेडाई महा संवाद मीटिंग 2026'**चे आयोजन 27 ऑगस्ट 2026 रोजी पुण्यातील हयात रीजन्सी येथे करण्यात आले. या एकदिवसीय कार्यक्रमात महाराष्ट्रातील 45 शहरांमधून 300 हून अधिक क्रेडाई सदस्यांनी सहभाग घेतला. रिअल इस्टेट क्षेत्रासमोरील प्रशासकीय, तांत्रिक, नियामक आणि धोरणात्मक अडचणी वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांसमोर थेट मांडून त्यांच्या व्यावहारिक उपाययोजनांवर चर्चा करणे हा महा संवादाचा प्रमुख उद्देश होता.

## अल्ट्रा-फास्ट डिलिव्हरी सेवा ॲमेझॉन नाऊ

**बंगळुरू :** ॲमेझॉन ने आज जाहीर केले की त्यांच्या अल्ट्रा-फास्ट डिलिव्हरी सेवा ॲमेझॉन नाऊ ने गेल्या तीन महिन्यांत भारतात 1 बिलियन डॉलर वार्षिक एकूण विक्रीचा टप्पा ओलांडला आहे. लॉन्च झाल्यापासून प्रत्येक तिमाहीत ॲमेझॉन नाऊ च्या ऑर्डर दुप्पट झाल्या आहेत, ज्यामुळे ती ॲमेझॉन इंडियाच्या इतिहासातील सर्वात वेगाने वाढणारी ई-कॉमर्स बिझनेस बनली आहे.

## छत्रपती संभाजीनगरला; विद्यार्थी, पालक व तज्ज्ञांशी साधणार संवाद

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

परभणी,- राज्यातील शासकीय भरती परीक्षा पद्धतीत सुधारणा करण्यासाठी गठित उच्चस्तरीय समिती सोमवार, दि. २१ रोजी जिल्ह्यात येत आहे. सोमवार दि.२१ रोजी सकाळी साडेदहा वा. छत्रपती संभाजीनगर येथील स्मार्ट सिटी कार्यालयात समिती विद्यार्थी, परीक्षार्थी व संबंधित घटकांना भेटून त्यांची मते जाणून घेणार आहे. या संदर्भात स्मार्ट सिटी कार्यालयात सर्व सज्जता करण्यात आली आहे. विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी आज सर्व आढावा घेतला.

राज्यातील शासकीय भरती परीक्षा अधिक पारदर्शक, सुरक्षित व विश्वासार्ह करण्यासाठी आवश्यक सुधारणा, तसेच परीक्षा प्रक्रियेतील अडचणी व त्यावरील उपाययोजनांबाबत राज्यशासनाने गठीत केलेल्या भरती परीक्षा सुधारणांसाठी नेमलेली उच्चस्तरीय समिती सोमवार दि.२१ रोजी जिल्ह्यात दाखल होत आहे. अपर मुख्य सचिव श्रीमती व्ही. राधा ह्या समितीच्या अध्यक्ष आहेत. तर वीरेंद्र सिंह, पोलीस महासंचालक सदानंद दाते, पशुसंवर्धन विभागाचे सचिव डी.एन. रामास्वामी इ. समिती सदस्य आहेत. समिती स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणारे परिक्षार्थी, अभ्यासिका चालक-मालक, शिक्षक, शैक्षणिक संस्था तसेच परीक्षा पद्धतीबाबत सूचना मांडू इच्छिणाऱ्या नागरिकांना भेटून चर्चा करणार आहे. त्यासाठी स्मार्ट सिटी कार्यालयात सकाळी साडेदहा वा. पासून सर्व संबंधित घटकांनी उपस्थित रहावे,असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## 772 विद्यार्थ्यांचा शैक्षणिक प्रवास पूर्ण; 699 जणांना पदवी प्रदान

### 16 विद्यार्थ्यांना सुवर्ण व कुलपती पदकाने गौरव; आर्या श्री, सँड्रा ॲन जॉन यांना प्रत्येकी दोन सुवर्णपदके

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी




**छत्रपती संभाजीनगर** : उच्च शिक्षणाचा टप्पा पूर्ण केलेल्या ७७२ विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला पदवी प्रदान सोहळ्याने औपचारिक पूर्णविराम मिळाला. यापैकी ६९९ विद्यार्थ्यांना झालेल्या पदवी प्रदान सोहळ्यात प्रत्यक्ष पदवी प्रदान करण्यात आली. विविध अभ्यासक्रमांत प्रावीण्य मिळवून उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या १६ विद्यार्थ्यांना यावेळी सुवर्ण तसेच कुलपती पदकाने गौरविण्यात आले. यामध्ये आर्या श्री आणि सँड्रा ॲन जॉन यांनी प्रत्येकी दोन सुवर्णपदके मिळवली.

पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये एमडी/एमएसचे १५, तर पीएच.डी.चे १२ विद्यार्थी आहेत. विविध शाखांतील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक गुणवत्तेची छाप पाडत पदवी संपादन केली. पदवी मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या पुढील शैक्षणिक आणि व्यावसायिक वाटचालीसाठी उपस्थित मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि सरस्वती वंदनाने झाली. कुलगुरू डॉ. शशांक दळवी यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाची भूमिका मांडली. विविध अभ्यासक्रमांत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या यशाचे यावेळी कौतुक करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अनुप्रिया महर्षी यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

पदकविजेत्यांचा गौरव

सुवर्ण व कुलपती पदक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये बुबेरे झैनब मुसव्विर, गाडे वत्सल यशवंत, आर्या श्री, कोटे श्रद्धा राजेंद्र, सँड्रा ॲन जॉन, कोविल रिवा राजीव, तान्या त्रिखा, चोरोटिया कुसुम प्रकाश बाबुदेवी, कोहाटी मादिहा तबरेझ रोशना, नंदिनी हरिगोपाल अग्रवाल आणि जैरामदासानी दिवेश शंकर यांचा समावेश आहे.

## जलसंधारण प्रकल्प राबवणार

**पुणे:** ॲमेझॉन इंडियाने पुण्यातील नॅशनल केमिकल लॅबोरेटरीच्या (एनसीएल) संशोधन कॅम्पसमध्ये एकात्मिक जलसंधारण प्रकल्प राबवण्यासाठी वॉटर टेक्नॉलॉजी स्टार्टअप फ्लक्सजेनसोबत सहयोगाची घोषणा केली आहे. ३८० एकरांच्या कॅम्पसमध्ये पसरलेला हा प्रकल्प या वर्षाच्या अखेरीस पूर्ण झाल्यानंतर दरवर्षी अंदाजे १७८ दशलक्ष लिटर पाण्याचे पुनर्भरण करेल, अशी अपेक्षा आहे. पाण्याचा वापर कमी करण्यासाठी, सांडपाणी गोळा करून त्यावर प्रक्रिया व पुनर्वापर करण्यासाठी आणि संपूर्ण कॅम्पसमध्ये भूजल पुनर्भरण करण्यासाठी हा प्रकल्प स्मार्ट सेन्सर्स, तसेच एरेटर आणि वॉटरलेस युरिनल्ससह कार्यक्षम उपकरणांचा वापर करेल.

## एलजी इलेक्ट्रॉनिक्स इंडियाला दोन पुरस्कार

**नवी दिल्ली :** बेंगळुरू येथे झालेल्या 25व्या आशिया पॅसिफिक एचआरएम काँग्रेस अवॉर्ड्स 2026 मध्ये एलजी इलेक्ट्रॉनिक्स इंडियाला दोन पुरस्कार मिळाले. कंपनीला 'टॉप ऑर्गनायझेशन विथ इनोव्हेटिव्ह एचआर प्रॅक्टिसेस', तर कंपनीचे सीएचओ ज्वा नाम किम यांना 'मोस्ट इम्पॅक्टफुल एचआर लीडर' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नेतृत्व विकास, कर्मचारी अनुभव, टॅलेंट डेव्हलपमेंट आणि संस्थात्मक क्षमतावृद्धीसाठी कंपनीच्या उपक्रमांची दखल घेण्यात आली. कंपनीने हा सन्मान आपल्या कर्मचारी-केंद्रित आणि भविष्यासाठी सज्ज संस्था उभारण्याच्या प्रयत्नांचे फलित असल्याचे म्हटले.

## इटोलीच्या आदित्य उन्हाळेची राज्यस्तरीय योगासन स्पर्धेत सुवर्ण कामगिरी



**जिंतूर, प्रतिनिधी :** नागपूर येथे कामगार कल्याण मंडळ, सक्करदरा येथे आयोजित करण्यात आलेल्या 20 व्या राज्यस्तरीय योगासन चॅम्पियनशिप 2026 मध्ये जिंतूर तालुक्यातील इटोली गावचा सुपुत्र आदित्य अरविंद उन्हाळे याने उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले आहे. या उल्लेखनीय यशामुळे त्याची राष्ट्रीय योग स्पर्धेसाठी निवड झाली असून तालुक्यासह इटोली गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. योगासन क्षेत्रात सातत्यपूर्ण सराव, जिद्द आणि मेहनतीच्या बळावर आदित्यने राज्यस्तरीय स्पर्धेत आपली छाप पाडली. विविध जिल्ह्यांतील स्पर्धकांमध्ये झालेल्या चुरशीच्या स्पर्धेत त्याने उत्कृष्ट योगप्रदर्शन सादर करत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. आदित्यच्या या यशामुळे इटोली गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थ, शिक्षक, क्रीडाप्रेमी व विविध सामाजिक संघटनांकडून त्याचे अभिनंदन करण्यात येत आहे. राष्ट्रीय स्पर्धेतही तो याच यशाची पुनरावृत्ती करून राज्याचे नाव उज्ज्वल करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. आदित्यच्या या यशाबद्दल गावातील नागरिकांनी त्याचे व कुटुंबियांचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. राष्ट्रीय स्तरावरही उल्लेखनीय कामगिरी करून इटोलीसह जिंतूर तालुक्याचे नाव उंचावावे, अशा अपेक्षा व्यक्त होत आहेत.

## ज्ञानोपासक महाविद्यालयात भारतीय मत्स्यखाद्य महोत्सव व कार्यशाळेला प्रतिसाद




जिंतूर- येथील ज्ञानोपासक महाविद्यालयात मत्स्यशास्त्र विभागाच्या वतीने भारतीय मत्स्यखाद्य महोत्सव व मत्स्य ओळख तंत्रज्ञान कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या दोन्ही उपक्रमांना विद्यार्थी व प्राध्यापकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. महाविद्यालयातील मत्स्यशास्त्र विभागात 'भारतीय मत्स्यखाद्य महोत्सव' व 'मत्स्य ओळख तंत्रज्ञान कार्यशाळा' या वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीधर भोंबे तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. धनाजी पाटील व डॉ. संदीप मरकड (सेनगाव) हे उपस्थित होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. शाम गोरे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. डॉ. संतोष जाधव, नॅंकचे समन्वयक प्रा. डॉ. दिनकर कोतवाल यांची विशेष उपस्थिती होती. या कार्यशाळेत विविध जिवंत मत्स्य प्रजातींचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. मत्स्यशास्त्राचे अभ्यासक प्रा. डॉ. पाटील व डॉ. मरकड यांनी उपस्थितांना कटला, रोहू, मिरगल, झिंगा, खेकडा इत्यादी विविध मत्स्य प्रजातींची ओळख करून दिली. तसेंच त्यांचे वेगळेपण, वैशिष्ट्ये व वर्गीकरण याविषयी प्रात्यक्षिकाद्वारे मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी बहुसंख्य मत्स्य अभ्यासक विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते. तर 'मत्स्यखाद्य महोत्सव' मध्ये स्वतः विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या मत्स्य पाककृती तयार करून त्यांचे प्रदर्शन भरविले. यामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनी तसेच प्राध्यापकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांनी बनवलेल्या विविध मत्स्य पदार्थांचा उपस्थितांनी आस्वाद घेतला. या उपक्रमातून भारतीय खाद्यसंस्कृतीमध्ये मत्स्य पदार्थांचे महत्त्व तसेच मत्स्य उत्पादनाला मूल्यवर्धनाची जोड देण्याचे महत्त्व अधोरेखित झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मत्स्यगंधा मंडळाचे अध्यक्ष आकाश देवकते तर आभारप्रदर्शन मत्स्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. निवृत्ती पोपतवार यांनी केले. या उपक्रमांच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. रवी कावळे, प्रा. डॉ. भागवत ठाकरे, प्रा. शिरीषकुमार रुद्रवार, प्रा. डॉ. नयना रत्नपारखी, संशोधक विद्यार्थिनी पूजा तरटे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## वन ऊर्जा क्षेत्राने 58.52 गिगावॅटचा टप्पा पार

**चेन्नई :** भारताच्या पवन ऊर्जा क्षेत्राने 31 ऑगस्ट 2026 पर्यंत 58.52 गिगावॅट स्थापित क्षमतेचा टप्पा गाठला आहे. आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये विक्रमी 6.05 गिगावॅट क्षमता जोडण्यात आली. विंडर्जी इंडिया 2026 मध्ये 2030 पर्यंत 100 गिगावॅट क्षमतेचे लक्ष्य, उत्पादन, निर्यात, ऑफशोअर पवन ऊर्जा आणि रिपॉवरिंगवर चर्चा होणार आहे. देशातील टर्बाइन उत्पादन क्षमता वार्षिक 24 गिगावॅट झाली असून, पवन उपकरणांची निर्यात ₹12,000 कोटींहून अधिक झाली आहे. ऑफशोअर प्रकल्पांनाही चालना मिळत आहे.

## एआय प्लसचा सर्व्हिस नेटवर्क विस्तार

**पुणे: :** एआय प्लस स्मार्टफोनने भारतातील विक्रीपश्चात सेवा अधिक सक्षम करण्यासाठी 1,000 हून अधिक सर्व्हिस टचपॉइंट्सपर्यंत नेटवर्क विस्तारण्याची योजना जाहीर केली आहे. विद्यमान 800 हून अधिक केंद्रांमध्ये 200 हून अधिक नवीन केंद्रांची भर पडणार आहे. दिल्लीमध्ये दिवाळीत कंपनीचे पहिले एक्सक्लुझिव्ह सर्व्हिस सेंटर सुरू होणार आहे.

## विराज आय अँड डेंटल हॉस्पिटलमध्ये डॉ भागवत कराड यांच्या हस्ते गणेश आरती संपन्न



**बिडकीन दि २१ सप्टेंबर :** भारत सरकारचे माजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवतजी कराड यांच्या हस्ते विराज आय अँड डेंटल हॉस्पिटल येथे श्री गणेश आरती करण्यात आली.यावेळी मुकुंदवाडी पोलीस ठाण्याचे *पोलीस निरीक्षक विवेकजी सोनवणे यांची हि उपस्थिती होती*. तसेच परिसरातील काही वंचित व गरजू मुलांनी गणेश आरतीमध्ये सहभाग घेऊन बाप्पांचे दर्शन घेतले. त्यानंतर . सुदर्शन कपाटे महाराज यांनी हॉस्पिटलला भेट देऊन या मुलांशी संवाद साधला आणि त्यांच्या सोबत काही वेळ प्रेमळ संवाद साधला. त्यांच्या या भेटीमुळे मुलांमध्येही आनंदाचे वातावरण निर्माण झाले. डॉ विक्रांत जयसवाल आणि डॉ. राजेश्वरी परदेशी जयसवाल यांची उपस्थित होते.या प्रसंगी गणेशोत्सवाच्या माध्यमातून सेवा, संस्कार आणि सामाजिक बांधिलकीचा सुंदर संदेश देण्यात आला.आरती वेळी हॉस्पिटल मधील सर्व कर्मचारी उपस्थिती होती.

## जनाबाई मरकड यांचे निधन



सिल्लोड प्रतिनिधी

सिल्लोड तालुक्यातील मंगरूळ येथील रहिवासी जनाबाई नामदेव मरकड यांचे वृद्ध काळाने निधन झाले मृत्यू समय त्यांचे वय 90 वर्षाचे होते त्यांच्या पाश्चात्य चार मुले दोन मुली जावई नातवंडे असा मोठा परिवार आहे.

पाहिजेत

श्री रेणुकामाता मल्टि स्टेट को. ऑप अर्बन क्रेडिट सोसायटी लि. अहिल्यानगर

बिडकीन शाखे करीता खालील जागा भरणे आहे

१) मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह- 5 जागा- बारावी पास

२) पिग्मी एजन्ट-5 जागा- बारावी पास

पत्ता- बँक ऑफ महाराष्ट्राच्या समोर मारवाडी गल्ली, बिडकीन मो. नं. 9225323223

# पक्षशिस्तीला प्राधान्य देत संघटन मजबूत करा

## रावसाहेब दानवे यांचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांना आवाहन; शासनाच्या योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याचे लोणीकरांचे निर्देश

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**जालना :** भारतीय जनता पक्षाच्या जालना महानगर जिल्हा कार्यकारिणीची बैठक रविवारी (२० सप्टेंबर) कलश सीड्स येथे झाली. पक्षशिस्त, संघटन बळकटी आणि आगामी कार्यक्रमांच्या नियोजनावर बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. पक्षहिताला सर्वोच्च प्राधान्य देत पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करावे, असे आवाहन भाजप नेते तथा माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी केले.




बैठकीस माजी मंत्री आमदार बबनरावजी लोणीकर, आमदार नारायणजी कुचे, आमदार सुहास शिरसाठ, माजी आमदार कैलासजी गोरंटयाल, भाजप जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. दीपप्रज्वलन, पूर्ण वंदे मातरम्, महाराष्ट्र गीत आणि बैठक गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

दानवे म्हणाले, पक्षात काम करताना पद किंवा वैयक्तिक मतभेदांपेक्षा पक्षाची शिस्त आणि संघटनात्मक बांधिलकी महत्त्वाची आहे. मतभेद बाजूला ठेवून पक्षहिताला प्राधान्य देत सर्वांनी एकजुटीने काम करावे. प्रत्येक पदाधिकारी व कार्यकर्त्याने केवळ पदापुरते मर्यादित न राहता जनतेमध्ये जाऊन काम करावे. बूथपासून महानगरापर्यंत संघटना अधिक सक्षम करण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न आवश्यक आहेत. पक्षाने दिलेली जबाबदारी प्रामाणिकपणे व शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडावी, असे त्यांनी सांगितले.

आमदार बबनरावजी लोणीकर यांनी केंद्र व राज्य शासनाच्या विविध विकासकामे आणि लोककल्याणकारी योजनांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यावर भर दिला. पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सातत्याने जनतेच्या संपर्कात राहून नागरिकांच्या अडचणी समजून घ्याव्यात, शासनाच्या योजनांची माहिती पोहोचवावी आणि नागरिकांच्या प्रश्नांसाठी प्रशासनाकडे पाठपुरावा करावा, असे आवाहन त्यांनी केले.

आमदार नारायणजी कुचे यांच्या मार्गदर्शनाखाली राजकीय ठराव मांडण्यात आला. आगामी संघटनात्मक व राजकीय कार्यक्रमांमध्ये पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी प्रभावी सहभाग नोंदवावा, यावर भर देण्यात आला. माजी आमदार कैलासजी गोरंटयाल यांनी एसआयआरच्या संदर्भातील आढावा व पुढील नियोजनाबाबत मार्गदर्शन केले.

भाजप जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी बूथस्तरापासून महानगरापर्यंत संघटना सक्षम करण्याचे आवाहन केले. तसेच १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबरदरम्यान राबविण्यात येणारे 'सेवा संकल्प अभियान' प्रभावीपणे राबविण्याचे आवाहन केले. प्रत्येक मंडल, प्रभाग, बूथ आणि घरापर्यंत अभियान पोहोचवून नागरिकांशी संवाद साधण्यावर भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

बैठकीस सर्व नगरसेवक, महानगर जिल्हा कार्यकारिणी सदस्य, मंडल पदाधिकारी, विविध आघाड्यांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# परिपत्रकाचा वाढदिवस साजरा करत शासनाचे लक्ष वेधले; हक्काच्या पाण्यासाठी संघर्ष तीव्र

**छत्रपती संभाजीनगर** :दि.२० सप्टेंबर - मराठवाड्याच्या हक्काच्या पाण्याचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, शासन निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी मराठवाडा समन्यायी पाणी वाटप संघर्ष समितीच्या वतीने दि.२० रोजी सिंचन भवनासमोर परिपत्रकाचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी मराठवाड्याला हक्काचे पाणी मिळावे, नदीजोड प्रकल्पांना गती मिळावी आणि शासनाने ठोस कार्यवाही करावी, अशा मागण्या करण्यात आल्या.



या वेळी डॉ. अण्णासाहेब शिंदे, दत्तात्रय पाटील, डॉ. सदाशिव पाटील, अशोक दाबके, माजी आमदार अ‍ॅड. विजयराव गव्हाणे, सुशीला मोराळे, पंडितराव शिंदे, प्रकाश आहेर आणि कडूबा कुमावत यांच्यासह संघर्ष समितीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

मराठवाड्याच्या पाणीप्रश्नावर शासनाने यापूर्वी घेतलेल्या निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी करावी, तसेच नार-पार, दमणगंगा-वैतरणा-गोदावरी यांसारख्या नदीजोड प्रकल्पांच्या माध्यमातून मराठवाड्याला पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

शासन निर्णय होऊनही प्रत्यक्षात अपेक्षित कार्यवाही होत नसल्याचा मुद्दा उपस्थित करत, परिपत्रकाचा वाढदिवस साजरा करून शासनाचे लक्ष वेधण्यात आले. मराठवाड्याच्या पाणीप्रश्नावर केवळ आश्वासने न देता ठोस निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी करावी, अशी भूमिका संघर्ष समितीच्या वतीने मांडण्यात आली.

मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थिती, शेतीसाठी पाण्याची गरज आणि पाणीटंचाईचा प्रश्न लक्षात घेता नदीजोड प्रकल्पांना गती देणे आवश्यक असल्याचेही यावेळी अधोरेखित करण्यात आले. शासन या मागण्यांवर कोणती भूमिका घेते आणि पुढील काळात काय कार्यवाही करते, याकडे मराठवाड्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# लोकसंवाद-2026' अंतर्गत पालममध्ये त्रिमूर्ती गणेश मंडळाच्या प्रांगणात आरोग्य योजनांची जनजागृती

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी :** सुदृढ व निरोगी जीवनासाठी शासनाच्या आरोग्य विभागामार्फत विविध योजना राबविण्यात येत असून, नागरिकांनी या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. बालाजी इप्पर यांनी केले. गणेशोत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना व उपक्रमांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी जिल्हा माहिती कार्यालयातर्फे राबविण्यात येत असलेल्या ' लो क सं वा द - २ ० २ ६ ' उपक्रमांतर्गत (दि.१८) पालम शहरातील त्रिमूर्ती गणेश मंडळाच्या प्रांगणात जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.




यावेळी डॉ. इप्पर यांनी नागरिकांना आरोग्य विभागाच्या विविध योजना, उपचारासाठी उपलब्ध सुविधा तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाच्या माध्यमातून मिळणाऱ्या मदतीची सविस्तर माहिती दिली. शासनाच्या योजनांची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचणे आणि पात्र लाभार्थ्यांनी त्याचा लाभ घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मंडळाचे अध्यक्ष कैलास चामले, उपाध्यक्ष विश्वजीत बाजगीर, सचिव श्रेयस विष्णू टाले, कोषाध्यक्ष हनुमान शिंदे यांच्यासह निखिल बाजगीर, विराज कदम, प्रसाद कवडे, अनिकेत कदम, श्रीनिवास शिंदे व व्यंकट भोसले यांनी सहकार्य केले.

# मल्लांनी गाजवला गणेश महासंघाचा आखाडा; जिल्हा परिषदेच्या मैदानावर रंगली कुस्त्यांची दंगल

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** डावपेच, ताकद आणि चितपट करण्याच्या जिद्दीने जिल्हा गणेश महासंघाच्या वतीने आयोजित कुस्त्यांचा आखाडा रविवारी जिल्हा परिषदेच्या मैदानावर रंगला. मराठवाड्यासह महाराष्ट्रातील विविध भागांतून आलेल्या मल्लांनी दमदार कुस्त्या करत मैदान गाजवले. दहा रुपयांपासून तब्बल ११ हजार रुपयांपर्यंतच्या कुस्त्यांनी आखाड्यात चांगलीच रंगत आणली.



संभाजी पेठेतील जिल्हा परिषदेच्या मैदानावर झालेल्या या कुस्ती दंगलीचे उद्घाटन मनपा स्थायी समितीचे सभापती अनिल मकरिये यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी माजी उपमहापौर राजू शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अभिजित देशमुख, जिल्हा गणेश महासंघाचे संस्थापक अध्यक्ष पृथ्वीराज पवार, उत्सव समितीचे अध्यक्ष हरिभाऊ हिवाळे पाटील, नगरसेवक गोकुळ मलके, गणेश लोखंडे आणि मुख्य मार्गदर्शक वस्ताद डॉ. हंसराज डोंगरे यांची उपस्थिती होती.

कुस्ती स्पर्धेपूर्वी पावसाने काही काळ हजेरी लावली. त्यानंतर वातावरण निवळताच आखाड्यात मल्लांच्या कुस्त्यांना सुरुवात झाली. चाळीसगाव, हर्सूल, बेगमपुरा, आष्टी, चिकलठाणा, देवळाई, सातारा परिसर, पळशी, नायगाव, रसूलपुरा यांसह जिल्ह्यातील विविध भागांतील कुस्तीपटूंनी सहभाग घेतला. एकमेकांना आव्हान देत मल्लांनी विविध डावपेचांची प्रात्यक्षिके दाखविल्याने उपस्थित प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांना दाद दिली.

सण-उत्सवाच्या परंपरेसोबत कुस्तीची संस्कृती जोपासणाऱ्या या दंगलीचे यंदाचे विशेष आकर्षण म्हणजे पंचक्रोशीतील अनुभवी वस्ताद, पैलवान तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर कुस्तीचा ठसा उमटविणाऱ्या मल्लांची उपस्थिती. त्यामुळे नवोदित कुस्तीपटूंनाही या आखाड्यातून प्रोत्साहन मिळाले.

कुस्ती स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी महासंघाचे कार्याध्यक्ष डॉ. राजेंद्र दाते पाटील यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. पंच कमिटीचे मुख्य मार्गदर्शन वस्ताद डॉ. हंसराज डोंगरे यांनी केले, तर कुस्ती स्पर्धेचे निवेदन बाबासाहेब थोरात यांनी केले.







**मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010**

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911